माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

रामाआ-तक्रार क्र.बीएम-१३० ते २००/२०२४ (एकूण-७१)

अपिलार्थी श्री. इक्बाल आर खान

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१ व २ (शहर)
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, कार्यकारी अभियंता (शहर) यांचे कार्यालय,
रुम नं.५३९, ४ था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (शहर)
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, कार्यकारी अभियंता (शहर) यांचे कार्यालय,
रुम नं.५३९, ४ था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

द्वितीय अपील आदेश दिनांक	तक्रार दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याकडून मागविण्यात आलेल्या अहवाल पत्र दिनांक	जन माहिती अधिकाऱ्यांचा अहवाल दिनांक
०६.०३.२०२४ २८.०२.२०२४	२७.०५.२०२४	१३.०७.२०२६	२७.०७.२०२६

तक्रारकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये आयोगाकडे दि. २७.०५.२०२४ रोजी ७१ स्वतंत्र तक्रार अर्ज दाखल केली आहेत.

२. सदर तक्रारींत त्यांनी असा उल्लेख केला आहे की, राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या ७१ द्वितीय अपीलांच्या अनुषंगाने सदरहु तक्रार अर्ज सादर केले आहेत. मा. राज्य माहिती आयुक्त यांच्या आदेशांनुसार जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१ व २ (शहर) यांच्याकडून कोणतीही माहिती / कागदपत्रे प्राप्त झालेली नाहीत. जन माहिती अधिकारी हे आयोगाच्या आदेशांची अंमलबजावणी करत नसून कोणत्याही प्रकारची माहिती जाणुनबुजून देण्यात आलेली नाही माहिती देण्यास टाळाटाळ केलेले असून माझी दिशाभूल करण्यात आलेली आहे.

त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमाच्या कलम २० (१) नुसार दंडाची कारवाई करावी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमाच्या कलम २० (२) नुसार शिस्तभंगाची कारवाई करावी तसेच मला अधिनियमाच्या कलम १९(८) (ख) नुसार नुकसान भरपाई द्यावी अशी विनंती केली आहे.

२. उक्त तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१ व २ (शहर) यांच्याकडून स्वतंत्ररित्या दि.१३.०७.२०२६ च्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता-१ व २ (शहर) यांच्याकडून स्वतंत्ररित्या दि.२७.०७.२०२६ च्या पत्रान्वये एकत्रितरित्या अहवाल सादर केला आहे. त्यात त्यांनी असा उल्लेख केला आहे की, "आयोगाच्या दि.१३.०७.२०२६ च्या पत्रान्वये एकूण ७१ अर्ज श्री. इक्बाल आर खान यांचे मा. आयोगास लिहिलेले पत्र या कार्यालयास प्राप्त झाले. सदर पत्र प्राप्त झाल्यानंतर श्री. इक्बाल आर खान यांना या कार्यालयात बोलावून संपूर्ण माहिती त्यांना म्हाडाच्या संकेतस्थळावर दाखविण्यात आली. तसेच सदरची माहिती त्यांना

..२/-

Pendrive मध्ये देण्यात आली आहे. सदर माहितीवरुन त्यांचे समाधान झाले व आता त्यांना कोणतीही तक्रार नाही असे पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे. सदरचे पत्र माहितीसाठी या पत्रासोबत सादर करण्यात येत आहे. सदरच्या पत्रान्वये श्री. इक्बाल आर खान यांचे सर्व तक्रार अर्ज निकाली काढणेबाबत विनंती केली आहे.

तक्रारकर्ता श्री .इक्बाल आर खान यांच्या पत्रात असे नमूद केले आहे की, " मी इक्बाल आर खान मला माहिती प्राप्त न झाल्यामुळे तक्रार केली होती. आता मला कार्यालयात बोलावून सदरची संपूर्ण माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असल्याचे दाखविण्यात आले आहे. तसेच सदरची माहिती मला Pendrive मध्ये देण्यात आली आहे. सदरची माहिती प्राप्त झाली असल्यामुळे माझे समाधान झाले आहे व सादर केलेल्या ७१ तक्रार अर्जांबाबत माझी कोणतीही तक्रार नाही. आपणांस विनंती करण्यात येते की सदरची बाब मा. राज्य माहिती आयोग यांच्या अवलोकनार्थ सादर करावी व माझे सर्व अर्ज निकाली काढणेबाबत विनंती.

४. सदर तक्रारींच्या अनुषंगाने सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्त्यास pendrive मध्ये माहिती दिली असून त्यांची पोच म्हणून सदर पत्राची प्रत आयोगास सादर केली आहे. त्यामुळे सदर प्रकरणात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (२) अन्वये सखोल चौकशी करण्याची आवश्यकता नाही असा निष्कर्ष काढून आयोग पुढील आदेश देत आहे :

आदेश

उपरोक्त विवेचनासह ७१ तक्रारीं निकाली काढण्यात येत आहेत.

State Information Commission Greater Mumbai

मुंबई
दिनांक : १५.१०.२०२६

15-10-2026.
(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

रामाआ-तक्रार क्र.बीएम-१३० ते २००/२०२४ (एकूण-७१)

अपिलार्थी श्री. इक्बाल आर खान

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१ व २ (शहर)
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, कार्यकारी अभियंता (शहर) यांचे कार्यालय,
रुम नं.५३९, ४ था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (शहर)
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, कार्यकारी अभियंता (शहर) यांचे कार्यालय,
रुम नं.५३९, ४ था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

द्वितीय अपील आदेश दिनांक	तक्रार दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याकडून मागविण्यात आलेल्या अहवाल पत्र दिनांक	जन माहिती अधिकाऱ्यांचा अहवाल दिनांक
०६.०३.२०२४ २८.०२.२०२४	२७.०५.२०२४	१३.०७.२०२६	२७.०७.२०२६

तक्रारकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये आयोगाकडे दि. २७.०५.२०२४ रोजी ७१ स्वतंत्र तक्रार अर्ज दाखल केली आहेत.

२. सदर तक्रारींत त्यांनी असा उल्लेख केला आहे की, राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या ७१ द्वितीय अपीलांच्या अनुषंगाने सदरहु तक्रार अर्ज सादर केले आहेत. मा. राज्य माहिती आयुक्त यांच्या आदेशांनुसार जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१ व २ (शहर) यांच्याकडून कोणतीही माहिती / कागदपत्रे प्राप्त झालेली नाहीत. जन माहिती अधिकारी हे आयोगाच्या आदेशांची अंमलबजावणी करत नसून कोणत्याही प्रकारची माहिती जाणुनबुजून देण्यात आलेली नाही माहिती देण्यास टाळाटाळ केलेले असून माझी दिशाभूल करण्यात आलेली आहे.

त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमाच्या कलम २० (१) नुसार दंडाची कारवाई करावी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमाच्या कलम २० (२) नुसार शिस्तभंगाची कारवाई करावी तसेच मला अधिनियमाच्या कलम १९(८) (ख) नुसार नुकसान भरपाई द्यावी अशी विनंती केली आहे.

२. उक्त तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१ व २ (शहर) यांच्याकडून स्वतंत्ररित्या दि.१३.०७.२०२६ च्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता-१ व २ (शहर) यांच्याकडून स्वतंत्ररित्या दि.२७.०७.२०२६ च्या पत्रान्वये एकत्रितरित्या अहवाल सादर केला आहे. त्यात त्यांनी असा उल्लेख केला आहे की, "आयोगाच्या दि.१३.०७.२०२६ च्या पत्रान्वये एकूण ७१ अर्ज श्री. इक्बाल आर खान यांचे मा. आयोगास लिहिलेले पत्र या कार्यालयास प्राप्त झाले. सदर पत्र प्राप्त झाल्यानंतर श्री. इक्बाल आर खान यांना या कार्यालयात बोलावून संपूर्ण माहिती त्यांना म्हाडाच्या संकेतस्थळावर दाखविण्यात आली. तसेच सदरची माहिती त्यांना

..२/-

Pendrive मध्ये देण्यात आली आहे. सदर माहितीवरुन त्यांचे समाधान झाले व आता त्यांना कोणतीही तक्रार नाही असे पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे. सदरचे पत्र माहितीसाठी या पत्रासोबत सादर करण्यात येत आहे. सदरच्या पत्रान्वये श्री. इक्बाल आर खान यांचे सर्व तक्रार अर्ज निकाली काढणेबाबत विनंती केली आहे.

तक्रारकर्ता श्री .इक्बाल आर खान यांच्या पत्रात असे नमूद केले आहे की, " मी इक्बाल आर खान मला माहिती प्राप्त न झाल्यामुळे तक्रार केली होती. आता मला कार्यालयात बोलावून सदरची संपूर्ण माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असल्याचे दाखविण्यात आले आहे. तसेच सदरची माहिती मला Pendrive मध्ये देण्यात आली आहे. सदरची माहिती प्राप्त झाली असल्यामुळे माझे समाधान झाले आहे व सादर केलेल्या ७१ तक्रार अर्जांबाबत माझी कोणतीही तक्रार नाही. आपणांस विनंती करण्यात येते की सदरची बाब मा. राज्य माहिती आयोग यांच्या अवलोकनार्थ सादर करावी व माझे सर्व अर्ज निकाली काढणेबाबत विनंती.

४. सदर तक्रारींच्या अनुषंगाने सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्त्यास pendrive मध्ये माहिती दिली असून त्यांची पोच म्हणून सदर पत्राची प्रत आयोगास सादर केली आहे. त्यामुळे सदर प्रकरणात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (२) अन्वये सखोल चौकशी करण्याची आवश्यकता नाही असा निष्कर्ष काढून आयोग पुढील आदेश देत आहे :

आदेश

उपरोक्त विवेचनासह ७१ तक्रारीं निकाली काढण्यात येत आहेत.

मुंबई
दिनांक : १५.१०.२०२६

State Information Commission Greater Mumbai

15-10-2026

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

निर्गमित
दिनांक 21 OCT 2026